सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शुक्रवार, दि. ३० मे २०२५ वर्ष - तिसरे अंक ५८ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## पाकव्याप्त काँग्रेस झाली आहे : देवेंद्र फडणवीस

तभा वृत्त सेवा
हिंगोली, २९ मे

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूर यशस्वी केले परंतु काँग्रेसचे नेते त्यावरही उलटसुलट प्रतिक्रीया देत आहेत. सर्जिकल स्ट्राईक, एअर स्ट्राईक केल्यानंतर याच नेत्यांनी भारतीय सैन्यावर प्रश्नचिन्ह निर्माण केले होते. परंतु यावेळी भारतीय सैन्यांनी ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तानात घुसून नऊ दहशतवादी अड्डे उध्वस्त केले. याचे चित्रीकरणही सैन्याने केले त्यामुळे काँग्रेसच्या नेत्यांना प्रश्नचिन्ह निर्माण करायला जागा उरली नाही. काँग्रेसच्या एका नेत्याने पाकिस्तानच्या १५ हजार रूपये किंमतीच्या ड्रोनवर भारताने १५ लाखांचे ड्रोन डागले अशी मुर्खासारखी प्रतिक्रीया दिली. यावरून काँग्रेसच्या डोक्यात पाकीस्तानचाच विचार किड्यासारखा घुसला आहे. पाकव्याप्त कश्मीर ऐकले होते परंतु आता पाकव्याप्त काँग्रेसही झाली आहे अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केली.

यावेळी पुढे बोलतांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पहलगामचा दहशतवादी हल्ला म्हणजे भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान होते. या हल्ल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी



दहशतवाद्यांना आणि त्यांच्या आकांना नेस्तनाबूत करण्याचा संकल्प घेतला. त्यानंतर भारतीय सैन्याने पाकीस्तानमध्ये घुसून ऑपरेशन सिंदूर राबवीत पाकीस्तानातील नऊ दहशतवादी अड्डे उध्वस्त केले. त्यामध्ये १५० पेक्षा जास्त दहशतवादी ठार झाले. मसूद अजहरचे संपूर्ण खानदान ठार झाले. त्यानंतर पाकीस्तानने भारतावर ड्रोन, मिसाईलने हल्ले केले परंतु भारतीय सैन्याने त्यांचे सर्व मिसाईल, ड्रोन हवेतच नष्ट करीत पाकीस्तानमधील ११ एअरबेस ब्रम्होस आणि इतर मिसाईलच्या माध्यमातून उध्वस्त केले. हा नवीन भारत आहे. घुसुम मारणारा भारत आहे. पंतप्रधान मोदींनी मेक इन इंडिया, आत्मनिर्भर भारतच्या माध्यमातून देशात ब्रम्होस सारखे मिसाईल तयार केले. त्याची ताकद पाकीस्तानला कळल्यानंतर पाकीस्तानने शरणागती पत्करली, युध्दविरामाची विनंती भारताला केली. ही आहे आत्मनिर्भर भारताची ताकद असून अवघा देश भारतीय सैन्याच्या पाठीशी ठामपणे उभा आहे, असेही यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.यावेळी राज्यमंत्री तथा हिंगोली संपर्क मंत्री मेधनाताई बोर्डीकर, आ. तान्हाजीराव मुटकुळे, डॉ अजित गोपछडे, संघटनमंत्री संजय कौडगे, माजी आ. रामराव वडकुते, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, शहराध्यक्ष रजनीश पुरोहीत, कैलास काबरा, डॉ विठ्ठल रोडगे, श्रीकांत पाटील, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा उज्ज्वला तांभाळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

## पीओके लवकरच आपले होईल : राजनाथ सिंह

नवी दिल्ली : पाकव्याप्त काश्मीर (पीओके) लवकरच भारताला परत मिळेल आणि तेथील लोक भारतात परततील असे प्रतिपादन केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केले. ते सीआयआय वार्षिक व्यापार शिखर परिषदेत बोलत होते.

यावेळी राजनाथ सिंह म्हणाले की मेक इन इंडिया हा भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेतील एक महत्त्वाचा घटक आहे. जर आपल्याकडे ही क्षमता नसती तर आपले सैन्य पाकिस्तानला पराभूत करू शकले नसते. दहशतवादाचा व्यवसाय चालवणे हे किफायतशीर नाही. उलट, त्यासाठी मोठी किंमत मोजावी लागू शकते. पाकिस्तानला आता हे चांगलेच कळले आहे. 'ऑपरेशन सिंदूर'



दरम्यान भारतीय सैन्याच्या शौर्याचा उल्लेख करताना काही दिवसांपूर्वी राजनाथ म्हणाले होते की भारतीय सैन्याने एका तज्ञ सर्जनप्रमाणे पाकिस्तानमधील दहशतवादी छावण्यांवर हल्ला केला आणि शत्रू देशाच्या सैन्याला गुडघे टेकवले.

'ऑपरेशन सिंदूर' नंतर पहिल्यांदाच त्यांच्या संसदीय मतदारसंघ लखनऊला पोहोचलेल्या संरक्षणमंत्र्यांनी सांगितले होते की, दहशतवादाविरुद्ध सुरू केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत भारताने पाकिस्तानमधील दहशतवादी छावण्यांवर यशस्वी हल्ला केला आणि मोठ्या संख्येने दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात यश मिळवले. ते म्हणाले की, भारतीय सैन्याने एका कुशल डॉक्टर आणि सर्जनसारखे काम केले. ज्याप्रमाणे एक कुशल सर्जन रोगाचे मूळ असलेल्या ठिकाणी आपली उपकरणे वापरतो, त्याचप्रमाणे भारतीय सैन्यानेही दहशतवादाच्या मुळांवर आपली शस्त्रे अत्यंत अचूकतेने वापरली. परंतु पाकिस्तानने भारतातील सामान्य नागरिकांनाही लक्ष्य करण्याचा प्रयत्न केल्याचे राजनाथ यांनी सांगितले.

## ठाण्यातून पाकिस्तानच्या गुप्तहेराला अटक

ठाणे : मुंबई जवळच्या ठाण्यातून पाकिस्तानच्या एका गुप्तहेराला अटक करण्यात आली आहे. भारतातली संवेदनशील माहिती पाकिस्तानला पुरवल्याचा आरोप अटक केलेल्या हेरावर आहे. या गुप्तहेराला महाराष्ट्र पोलिसांच्या दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) अटक केली आहे.

आरोपी मुंबईतील एका महत्त्वाच्या संस्थेसाठी काम करत होता आणि एका पाकिस्तानी एजंटने त्याला 'हनीट्रॅप'मध्ये अडकवले होते. पाकिस्तानी एजंटने फेसबुकवर महिला असल्याचे भासवून आरोपीशी मैत्री केली होती. आरोपीने नोव्हेंबर २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत व्हॉट्सॲपद्वारे एका 'पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणे'ला एका महत्त्वाच्या आस्थापनेबद्दलची संवेदनशील माहिती शेअर केली होती.

खबऱ्याकडून मिळालेल्या माहितीआधारे एटीएसच्या ठाणे शाखेने आरोपीला इतर दोघांसह ताब्यात घेतले. सुरुवातीच्या चौकशीनंतर, त्या व्यक्तीला अधिकृत गुपित कायद्याच्या कलम ३ (जे हेरगिरीशी संबंधित

## ई-ऑफिस सक्तीचे; १ जूनपासून मंत्रालयात कागदी फाईल्स बंद

मुंबई : महाराष्ट्र सरकारने मोठा निर्णय घेत ई-ऑफिस प्रणालीचा वापर मंत्रालयात आता सक्तीचा केला आहे. येत्या १ जून २०२५ पासून मंत्रालयात कुठल्याही कागदी फाईल्स स्वीकारल्या जाणार नाहीत, अशी स्पष्ट सूचना उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने जारी केली आहे. या निर्णयामुळे शासकीय कामकाज वेगवान, पारदर्शक आणि डिजिटल होणार असून, नागरिकांच्या कामकाजात गती येण्याची शक्यता आहे.

फक्त डिजिटल फाईल्स मान्य

१ जूनपासून मंत्रालयात केवळ ई-फाईल स्वरुपातील नस्त्याच स्वीकारल्या जातील. स्कॅन करून पाठवलेल्या कागदपत्रांना देखील यामध्ये मान्यता दिली जाणार नाही. प्रत्येक ई-फाईल ग्रीन नोटद्वारे तयार करून संबंधित अधिकाऱ्यांच्या डिजिटल स्वाक्षरीने सादर करणं अनिवार्य आहे.

कागदी टपाल, नोंदीही बंद

कोणत्याही प्रकारचा भौतिक टपाल आता कार्यासनाकडे पाठवू नये, तो ई-ऑफिसद्वारेच पाठवावा, असे आदेश आहेत.

सहसचिव, सचिव, अपर मुख्य सचिव यांच्या कार्यालयात देखील भौतिक टपाल स्वीकारण्यास मनाई आहे.

अशा प्रकारचा टपाल मध्यवर्ती केंद्रात जमा करावा लागेल.

१५० दिवसांचा कार्यक्रम आणि २५ गुणांची मोजणी

राज्य शासनाने १५० दिवसांच्या कार्यक्रमात ई-ऑफिसचा १००% वापर हे उद्दिष्ट ठेवले असून त्यासाठी २५ गुणांची गुणांकन पद्धत लागू करण्यात आली आहे.

कार्यालयीन नियमांमध्ये बदल

'महाराष्ट्र कार्यालयीन कार्यपद्धती नियमपुस्तिका, १९६३' मध्ये सुधारणा करत आता '२०२३ नियमपुस्तिका' लागू करण्यात आली आहे. त्यानुसार संपूर्ण शासकीय कामकाज ई-ऑफिसद्वारेच व्हावं, असा स्पष्ट आदेश आहे.

सर्व क्षेत्रीय कार्यालयांनाही आदेश

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या सर्व प्रभाग व क्षेत्रीय कार्यालयांनाही ई-ऑफिस सक्तीचं करण्यात आलं असून, कोणत्याही परिस्थितीत कागदी फाईल्स वा टपाल पाठवू नये, याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. सरकारच्या या डिजिटल क्रांतीमुळे पारंपरिक कागदी कामकाजाचा युग संपुष्टात येत असून, प्रशासन अधिक गतिमान, कार्यक्षम आणि पारदर्शक होणार आहे. या निर्णयामुळे 'फाईल खोळंबली' ही जुनी तक्रारही आता इतिहासजमा होणार आहे.

शासनाच्या परिपत्रकात नेमकं काय?

शासकीय कामकाजात संगणकाचा अधिकाधिक वापर करून शासकीय कामकाज गतिमान व्हावे, कामकाजात सुसुत्रता यावी, दस्ताऐवज व माहिती सुरक्षित रहावी, निर्णय प्रक्रिया गतिमान व सुलभ व्हावे यासाठी शासकीय कामकाजात दि.१.४.२०२३ पासून ई ऑफीस प्रणालीचा प्रभावी वापर करण्याच्या दृष्टीने शासन परिपत्रकान्वये सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यानुषंगाने उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागात ई-ऑफीस चा वापर करण्यासाठी वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत. मात्र या विभागात सदर प्रणालीचा वापर होत नसलेचे निदर्शनास आले. त्यामुळे येथील कार्यालयीन आदेशान्वये दि.१.१.२०२४ पासून या विभागात ई-ऑफीस प्रणालीचा वापर करणे अनिवार्य केलेले आहे. त्यानंतरही ई-ऑफीस चा वापर होत नसल्याने पत्रांन्वये सूचना निर्गमित केलेल्या आहेत. अद्यापही या विभागांतर्गत शासकीय कामकाजात ई-ऑफीस चा प्रभावी वापर होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच महाराष्ट्र कार्यालयीन कार्यपद्धती-२०२३ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार सर्व टपाल इलेक्ट्रॉनिक स्वरूपातच तयार व जतन केले जावे. फिजीकल फाईल केवळ अत्यावश्यक परिस्थितीतच तयार केली जावी. प्रशासकीय प्रक्रियेमध्ये पारदर्शकता व कार्यक्षमता आणण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दि.१२ जुलै, २०२४ अनुसार धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. याशिवाय, नवीन नोंदी तयार करताना महाराष्ट्र कार्यालयीन कार्यपद्धतीचा वापर करावा. सर्व विभागांनी याचे पालन करणे बंधनकारक आहे.

तसेच १५० दिवसांच्या कार्यक्रमामध्ये देखील ई-ऑफीसच्या प्रभावी वापराबाबत मुद्दा समाविष्ट केला असून सदर उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी गुणांकन (२५ गुण) ठेवण्यात आलेले आहे. वरील वस्तुस्थिती विचारात घेता तसेच १५० दिवसांच्या कार्यक्रमातील सदर प्रणालीचा १०० टक्के वापराबाबतची कालबद्धता विचारात घेता विभागांतर्गत ई-ऑफीस चा वापर बंधनकारक करण्याची बाब विचाराधीन होती. शासन परिपत्रक, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागात तसेच सदर विभागाच्या अधिनस्त सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये दि.१.६.२०२५ पासून ई-ऑफीस (ए-जषषळलश) चा वापर करणे बंधनकारक करण्यात येत आहे.

## वारकऱ्यांना मिळणार विम्याचा लाभ : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई : आषाढी वारीनिमित्त वारीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांना संरक्षण देण्यासाठी त्यांचा समूह विमा काढण्यात येईल, तसेच त्यांना दरवर्षीप्रमाणे यावर्षीही वैद्यकीय सेवा पुरवण्यात येतील, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले. आषाढी वारीनिमित्त केलेल्या उपाययोजना आणि वारकऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली काल सह्याद्री अतिथीगृहात विशेष बैठक पार पडली होती. त्याविषयीची अधिक माहिती प्रसार माध्यमांना देतांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते.

नुकत्याच झालेल्या मुसळधार पावसामुळे वारी मार्ग कुठेही खराब झाला असल्यास मुरूम, खडी आणि डांबरीकरण करून त्याची तातडीने डागडुजी करावी, वारकऱ्यांना मुबलक पाणी, विजेची जोडणी, पालखी तळावर वॉटरप्रूफ तंबू उपलब्ध करून घ्यावे तसेच वारीसाठी जाणाऱ्या गाड्यांना दरवर्षीप्रमाणे टोल मध्ये सवलत दिली जाईल, असेही उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले. गतवर्षीप्रमाणे याहीवर्षी आषाढी वारीनिमित्त राज्याच्या आरोग्य विभागाकडून भव्य आरोग्य शिबिरे आयोजित केली जातील, वारकऱ्यांसाठी कार्डीएक रुग्णवाहिकेची सोय उपलब्ध करून दिली जाईल, पंढरपुरात तात्पुरती आयसीयू सुविधा उपलब्ध करून दिली जाईल, या सर्व सोयी उपलब्ध करून देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी स्वतः पंढरपूरला जाऊन आढावा घ्यावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी यावेळी त्यांना दिले. तसेच प्रत्येक जिल्ह्यातून निघणाऱ्या मोठ्या दिंड्यांना वारीच्या काळात पूर्णवेळ सुसज्ज रुग्णवाहिका उपलब्ध करून द्यावी, असेही उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले. यासोबतच गतवर्षी वारीदरम्यान झालेल्या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या वारकऱ्यांना शासनाद्वारे मदत केली जाईल, पोलिसांशी व्यवस्थित समन्वय व्हावा यासाठी नोडल ऑफिसर नेमण्यात येईल. वारकऱ्यांचे भोजन आणि इतर प्रथा परंपरा वेळच्या वेळी पार पाडाव्यात यासाठी वारी कुठे जास्त वेळ खोळंबणार नाही यासाठी प्रयत्न केला जाईल, यंदाची वारीही स्वच्छ वारी, निर्मल वारी, हरित वारी म्हणून आपल्याला पार पाडायची असल्याने त्यासाठी लागेल ते सर्व सहकार्य शासनाकडून केले जाईल, असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

## गंगापूर शहरात २० दिवसांपासून पाणीपुरवठा ठप्प : नागरिक हैराण

गंगापूर दि.२९ : गंगापूर शहरात नगर पालिकेकडून होणारा पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांना मागील २० दिवसांपासून पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. शहरातील नागरिकांना एक ड्रम साठी ५० रुपये तर घरगुती घरपोच जार २० रुपये,तर स्वतः आणल्यास १० रुपये मोजावे लागतात नागरिकांना पिण्यासाठी पाणी विकत घ्यावे लागत आहे. त्यामुळे सर्वसामान्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे.शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यात यावा अशी मागणी नागरिकांकडून करण्यात आली आहे. सरकारकडून पाणीपुरवठा योजनेसाठी लाखो करोडो रुपये खर्च करण्यात येत असताना देखील नगरपालिका प्रशासनाकडून पाणीपुरवठा करण्यात येत नसल्याने नागरिकांकडून नगरपालिकेविषयी रोष व्यक्त करण्यात येत आहे वारंवार मोटार बिघडणे पाईपलाईन फुटणे किंवा लाईट नसल्याने या ना त्या कारणाने पाणीपुरवठा करण्यात येत नाही नगरपालिकेकडून लवकरात लवकर पाणीपुरवठा सुरळीत करून नागरिकांना वेळेच्या वेळी पाणी देण्यात यावे अशी मागणी जोर करत आहे.




## स्वच्छता, सीसीटीव्ही, अपूर्ण कामे जलद गतीने पूर्ण करा : आ. विलास भुमरे

तभा वृत्तसेवा

पैठण दि २९ :- शहरात सुरू असलेल्या मान्सूनपूर्व कामा बद्दल आमदार विलास बाप्पू भुमरे यांच्या अध्यक्षतेखाली कृषी उत्पन्न बाजार समिती पैठण येथे शासकीय बैठक पार पडली. यावेळी शहरात होत नसलेली स्वच्छता, अपूर्ण सीसीटीव्ही काम दूषित पाणीपुरवठा आणि ईतर सुरू असलेली अपूर्ण कामे १५ दिवसांच्या आत पूर्ण करा असे आदेश आमदार विलास बाप्पू भुमरे यांनी अधिकाऱ्यांना दिले.



या बैठकीत शहरातील नालेसफाई,सि. सि.टी.व्हि.कँमेरे,पाणी पुरवठा,विद्युत पुरवठा,या विशेष प्रश्नावर भर देत आवकाळी पावसामुळे नागरिकांना विविध समस्याचा सामना करावा लागल्याने मस्तवाल झालेल्या अधिकाऱ्यांना येत्या पंधरा दिवसात नागरिकांच्या विविध समस्या सोडवा,अन्यथा कारवाईला सामोरे जा असा सज्जड दम ही आमदार भुमरे यांनी अधिकाऱ्यांना दिला. शहरातील सि.सि.टि.व्हि कँमेरे असुनही ठेकेदाराच्या दुर्लक्षपणामुळे शहरातील होत असलेल्या चोऱ्या,रस्त्यावरील हणामारी च्या घटना कँमेरे असुन उपयोग होत नाही.यावरील नागरी सुविधा देताना कामचुकारपणा करु नका अशा तातडीच्या सुचना देण्यात आल्या.यावेळी तहसीलदार दिनेश झांपले, मुख्याधिकारी,पल्लवी अंभोरे नगरपरिषद , सार्वजनिक बांधकाम कार्यकारी अभियंता धनंजय शेळके महावितरण उप अभियंता,सतिष वंगळ कृषी अधिकारी विकास पाटील,पोलीस निरीक्षक संजय देशमुख, पैठण यांच्या सह दुध संघाचे नंदलाल काळे,नाथ संस्थानचे कार्यकारी विश्वस्त दादा बारे, माजी नगराध्यक्ष राजु गायकवाड,सोमनाथ परदेशी, नगरसेवक भुषण कावसानकर, तुषार पाटील,अजित पगारे युवा उद्योजक किशोर तावरे,शिवराज पारीक,शहादेव लोहारे,खुशालराव भवरे,तिष अंधळे,अमोल पाटील जाधव,गाढे महाराज,रघुनाथ ईच्छय्या, मोतीलाल घुंगासे, राहुल टाक, संतोष बोठे, संजय कस्तुरे,मिठू नन्नवरे बत्ती गिरे आदी उपस्थित होते.

## अतिष गायकवाड यांच्यावर जीवघेणा हल्ला



पैठण दि २८ :- अखिल भारतीय मराठा युवक महासंघाचे प्रदेश अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते अतिष गायकवाड यांच्यावर मंगळवारी रात्री पैठण शहरातील झुंझे हाऊसच्या कॉर्नरला अज्ञात पाच ते सहा हल्लेखोरांनी लोखंडी रॉड, हॉकी स्टिकने हल्ला केला असून या जीवघेण्या हल्ल्यात गायकवाड हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथील गजानन हॉस्पिटल याठिकाणी उपचार सुरू आहेत. सामाजिक चळवळीत हिराईने सहभाग घेणारे अतिष गायकवाड हे आपल्या दुचाकीवर मंगळवारी रात्री १० वाजेच्या आसपा घराकडे जात असतांना त्यांना हुतात्मास्मारक जवळील झुंझे मंगल कार्यालयच्या कॉर्नरला अनोळखी पाच ते सहा हल्लेखोरांनी अडवून गायकवाड यांच्यावर लोखंडी रॉड, हॉकी स्टिक, लाठ्या काठ्या,फायबर स्टिकने हल्ला चढवला या हल्ल्यात अतिष गायकवाड हे गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील गजानन हॉस्पिटल मध्ये दाखल करण्यात आले. या हल्ल्यात गायकवाड यांच्या शरिरावर जवळपास ७ ते ८ ठिकाणी फॅक्चर झाल्याने त्यांना आयसीयूमध्ये ठेवण्यात आले आहे.या भ्याड हल्ल्याचा पैठण शहरासह तालुक्यात निषेध होत असून सामाजिक कार्यकर्ते यांच्यावर असे हल्ले होऊ नये म्हणून तसेच गायकवाड यांच्यावर हल्ला करणाऱ्या हल्लेखोरांना गजाआड करून त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी यासाठी पैठणकर आंदोलन करणार आहेत.

## वैष्णवी आत्महत्या प्रकरणी पती, सासू आणि नणंद यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

पुणे : वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणातील आरोपी तिचा पती शशांक हगवणे, सासू लता हगवणे आणि नणंद करिश्मा हगवणे यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. शिवाजीनगर न्यायालयाने हा निर्णय दिला आहे. यापूर्वी तिघांना एका दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती, मात्र तपास पूर्ण झाल्याचे कारण देत आता त्यांना येरवडा कारागृहात पाठवण्यात येणार आहे. वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणातील तिघा आरोपींना शिवाजीनगर कोर्टात हजर केल्यानंतर, पोलीस तपास पूर्ण झाल्याचे न्यायालयात सांगण्यात आले.

पोलिसांनी सुनावणीत पोलीस कोठडीची मागणी केली नाही. गरज पडल्यास आम्ही कोठडी मागू असे पोलिसांनी न्यायालयाला सांगितले आहे. त्यानुसार या तिघांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी देण्यात आली आहे. ती मिळताच सासू आणि नणंद दोघींनी जामीन अर्ज दाखल केल्याची माहिती समोर आली आहे. याआधी दोन वेळा पोलीस कोठडी घेण्यात आली होती. आता सध्या मात्र न्यायालयीन कोठडी सुनावल्यामुळे तिघांना येरवडा कारागृहात ठेवण्यात येणार आहे.

दरम्यान, या प्रकरणात फरार आरोपी निलेश चव्हाणला पकडल्याचा बनावट फोन करणाऱ्या संतोष दत्तात्रय गायकवाड या व्यक्तीला पोलिसांनी अटक केली आहे. फोन नंबरच्या आधारे लोकेशन शोधून त्याला ताब्यात घेण्यात आलं असून त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वैष्णवी हगवणे हिचे वडील अनिल कस्पटे म्हणाले की, निलेश चव्हाण हा देखील या संपूर्ण कटात सहभागी होता. त्या दिवशी तो तिथेच होता, असा दावा अनिल कस्पटे यांनी केला आहे. पोलिसांनी आता निलेश चव्हाणचा शोध अधिक गतीने सुरू केला आहे. वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणात दररोज नव्या घडामोडी समोर येत आहेत.